महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

पत्र क्रं अविमं/माप/उमाप 9449

दि. १४/१०/२०२५

प्रति,

मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग अमरावती

**विषय** :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ १० वी) परीक्षा, फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या परीक्षांच्या तारखांबाबत..

**संदर्भ** :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-६/३४८६,दि.१३ /१०/२०२५ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी) परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या परीक्षांच्या तारखांबाबतचे प्रकटन पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी.ही विनंती.

आपली विश्वासू

S. Salunke

(संगीता साळुंके)
विभागीय सहा.सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्र** :- प्रकटनाची प्रत

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव राज्य मंडळ, पुणे

२)शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.

३) मुख्याध्यापक /प्राचार्य, सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, अमरावती विभाग अमरावती यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

**विषय— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु—मार्च २०२६ परीक्षांच्या तारखांबाबत...**

## ।। प्र क ट न ।।

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आगामी फेब्रुवारी—मार्च २०२६ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा पुढील तारखांना आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा कालावधी | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा | मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, दि. १८ मार्च २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाईन परीक्षेसह) | शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, दि. १८ मार्च २०२६ |
| २. | प्रात्याक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा | शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ ते सोमवार, ०९ फेब्रुवारी २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) | सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ (शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) |

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी—मार्च २०२६ परीक्षेच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा वरीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.

उपरोक्त परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल.

याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १३/१०/२०२५

(प्रमोद गोफणे)
सहसचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.